**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक २८.०८.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २७.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०५ ईसमावर कारवाई करून एकुण २२,३३०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसेसमध्ये ०७ इसमांवर कारवाई करून एकुण ४,२६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,७८२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,४१,६५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २७.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २८.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०८ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०८.२०२६ चे १७.२५ वा ते १९.३५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना अवैध देहव्यवसायाबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे हद्दीत, संजिवनी क्वॉटर क्र. ३४/१, संगमनगर, वनदेवी चौक, हॉटेल अल रहमान समोरील गल्लीमध्ये पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी प्रविण शालिकराम बिलसे (यादव) वय ३० वर्ष रा. पवननगर, अम्माचे दर्गाहजवळ, यशोधरानगर, नागपूर हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ०३ पिडीत महिलांना पैशांचे आमिष दाखवून घटनास्थळी जागा व ग्राहक उपलब्ध करुन देऊन त्यांचेकडून अनैतिक देहव्यापार करवून घेताना मिळून आला. आरोपींचे ताब्यातुन रोख ८,७५०/— रु, ०१ मोबाईल, बर्गमन मोपेड क्र. एमएच ४९ सीजे ६०८२ व **इतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे १,१८,८००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनास्थळावरुन ०३ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली. आरोपी विरूध्द पो**लीस ठाणे यशोधरानगर येथे कलम १४३(२) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५,७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण विभाग), मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. युनुस चांद शेख, पोउपनि निलकंठ नन्नावरे, पोहवा गणेश गुप्ता, राजेश वासनिक, रवि

अहीर, लक्ष्मण पडवाल, पोअं रितेश दुधे, मंगेश गिरी, गजानन गेडाम, योगेश व मपोअं वर्षा नोनारे व बबिता नन्नावरे यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कोराडी :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २८.०८.२०२६ चे ००.१० वा. चे सुमारास, कोराडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, बोखारा रिंग रोड, रामनाथ सिटी परिसरात एक इसम शस्त्र घेवून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अभिजीत सत्यंजय वंजारी वय २१ वर्षे रा. सिदधार्थ नगर, मजदुर चौक, महादुला, कोराडी, नागपूर असे सांगीतले. इसमाची अंगझडती घेतली असता, त्यांचे कंबरेत मागील बाजुस पॅन्टचे आत एक लोखंडी जुना चाकु किंमती २००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कोराडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे गणेशपेठ :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी किशोर श्यामसुंदर समुंद्रे वय ६५ वर्षे, रा. शिवमंदीर, रामकृष्ण रिक्षा गॅरेज, गंजीपेठ, फायर ब्रिगेड, नागपूर यांचा परिचय मॉर्निंग वॉकिंग दरम्यान राहुल श्रीराम बहोरीया वय ४० वर्ष, रा. हनुमान पारशी समाज मंदीर, लोधीपुरा, गणेशपेठ, नागपुर यांचे सोबत झाला होता. त्याने तो समाजसेवक असल्याचे भासवुन, फिर्यादीसोबत संबध वाढविले त्याने त्याचे शिक्षण विभागातील अधिकारी याचेसोबत चांगले संबंध असल्याचे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. आरोपी राहुल याने फिर्यादीची मुलगी व सुन तसेच इतर नातेवाईक यांना नौकरी लावून देऊ शकतो असे खोटे आमिष दाखविले तसेच त्याने त्याचे साथीदार २) शुभम भुरघाटे ३) अभिजीत कृष्णराव देशमुख ४) सिमा खंडेवाल ५) गीत अवस्थी यांचेसोबत संगनमत करुन फिर्यादीस आरोपी क्र. २ ते ४ हे शिक्षण विभागाचे अधिकारी असल्याचे भासविले. आरोपीने दिनांक १५.०७.२०२६ चे ०८.०० वा. ते दि. २७.०८.२०२६ चे १८.०० वा. चे दरम्यान फिर्यादीचे परिवारातील पाच सदस्यांचे नौकरी करीता फार्म भरुन घेतले व वेगवेगळया बहाण्याने कमिटीतील अधिकारी यांना देण्याकरीता फिर्यादीकडून एकूण ५,१३,०००/— रु. घेतले. तसेच फिर्यादीचा मित्र गुलाब बैस यांचे मुलीला नौकरी लावुन देण्याचे आमिष दाखवून त्यांचेकडून १,४६,०००/— रु. असे दोघांकडून एकूण ६,५९,०००/— रु. घेऊन कोणालाही नौकरी नावून न देता तसेच रक्कम परत मागितली असता, नेहमी टाळाटाळ केली व रक्कम परत न करता फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे मपोउपनि. नयना माहुलकर ८६९८१५५८४२ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** अनिल केशव गोसावि वय ४८ वर्षे, रा. नरसाळा, पेट्रोल पंपजवळ, हबीब खानचे घरी किरायाने, हुडकेश्वर, नागपूर हे दिनांक १८.०८.२०२६ चे १२.१५ वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांब, बांधा—मध्यम, उंची—५ फुट ४ इंच, केस—काळे, अंगात—

कत्था रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. सोबत ऑटोरिक्षा नेलेली आहे.



अनिल

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**